शिवाजी विद्यापीठ मराठी शिक्षक संघ, कोल्हापूर
विद्वत्प्रमाणित, यू.जी.सी. मान्यताप्राप्त त्रैमासिक
(Peer Reviewed Referred Research Journal)
ISSN No. 2319-6025

# शिविम संशोधन पत्रिका

वर्ष-नववे : जोडअंक-एकवीस आणि बावीस : जानेवारी ते जून २०२०

## मध्ययुगीन मराठी वाङ्मयातील विविध संप्रदाय

दिनांक १ व २ फेब्रुवारी, २०२०



## सद्गुरु गाडगे महाराज कॉलेज, कराड

(स्वायत्त महाविद्यालय)
ता. कराड जि. सातारा
राष्ट्रीय उच्चस्तर शिक्षा अभियान (रुसा)

Scanned by CamScanner

शिवाजी विद्यापीठ मराठी शिक्षक संघाचे विद्वत्प्रमाणित त्रैमासिक

# शिविम संशोधन पत्रिका

(Peer Reviewed refered Research Journal - ISSN No. 2319-6025)]

( विद्यापीठ अनुदान अयोग नवी दिल्ली, मान्यता अ.क्र. ६४१७५ )

## सद्गुरु गाडगे महाराज कॉलेज, कराड

राष्ट्रीय उच्चतर शिक्षा अभियान (रुसा)

वर्षे नववे : अंक एकवीस - बावीस

जानेवारी - फेब्रुवारी - मार्च - एप्रिल - मे - जून २०२०

## मध्ययुगीन मराठी वाङ्मयातील विविध संप्रदाय

**संपादक**

डॉ. शिवकुमार सोनाळकर

**अतिथी संपादक**

डॉ. मोहन राजमाने,

प्राचार्य, स.गा.म. कॉलेज, कराड

डॉ. रेश्मा दिवेकर प्रा. डॉ. रमेश पोळ

**कार्यकारी संपादक**

डॉ. नीला जोशी

**संपादक मंडळ**

डॉ. नंदकुमार मोरे, डॉ. गोमटेश्वर पाटील, डॉ. तातोबा बदामे, डॉ. दिनेश बाघुंबरे

**सल्लागार समिती**

डॉ. राजन गवस, डॉ. प्रकाश कुंभार, डॉ. डी. ए. देसाई, डॉ. अनिल गवळी

**प्रकाशक**

अध्यक्ष, शिवाजी विद्यापीठ मराठी शिक्षक संघ, कोल्हापूर

अनुराज, ७/ब, सूर्यवंशी कॉलनी, सानेगुरुजी वसाहत, कोल्हापूर ४१५०११

**मुद्रक**

श्रीधर मुद्रणालय, कराड

३३८, सोमवार पेठ, कराड ४१५११०

मोबा. ९८९०४९८४९७

**मूल्य : ३००/-**

ही संशोधन पत्रिका प्रकाशक डॉ. शिवकुमार सोनाळकर यांनी शिवाजी विद्यापीठ मराठी शिक्षक संघ, कोल्हापूर यासाठी श्रीधर मुद्रणालय, कराड येथे छापून अनुराज, ७/ब, सूर्यवंशी कॉलनी, सानेगुरुजी वसाहत, कोल्हापूर ४१५०११ येथे प्रकाशित केली. या पत्रिकेत प्रकट झालेल्या मताशी संपादक, प्रकाशक, सल्लागार व मुद्रक सहमत असतीलच असे नाही.



Scanned by CamScanner

* लोकशिक्षक : एकनाथ
श्री. संतोष लोंढे २७०
* संत एकनाथांच्या भारुडातील परमार्थ
शैला क्षीरसागर २७२
* संत एकनाथांच्या भारूडांचे स्वरूप
प्रा. लक्ष्मी पवार २७५
* संत एकनाथांच्या भारुडातील सामाजिक दर्शन
प्रा. विलास सुर्वे २७८
* संत वाङ्मयातील एक अविष्कार : 'भारुड'
नेहा भारत ढेकळे २८२
* वारकारी संप्रदायातील तुकाराम
प्रा.संजय चव्हाण २८५
* वारकरी संप्रदाय आणि संत तुकारामांची शिकवण
डॉ. मनमोहन राजे २८९
* संत तुकाराम - संत बहिणाबाई भावबंध
डॉ. रमेश पोळ २९४
* संत तुकारामांचे सांस्कृतिक योगदान
प्रा. विजयकुमार रेंदाळकर २९८
* तुकाराम मीमांसा : एक आकलन
मच्छगंधाली तारळेकर ३०१
* संत तुकाराम यांच्या काव्यातील समाजदर्शन
डॉ. कृष्णा भवारी ३०५
* संत तुकारामांच्या अभंगातील लोककथा
डॉ. यशवंत चव्हाण ३०९
* संत तुकारामांच्या साहित्यातील समकालिन जीवनमूल्ये
श्री.रघुनाथ गवळी ३१३
* संत तुकारामांची कविता
डॉ. चंद्रकांत पोतदार ३१६
* निर्भीड टीकाकार संत तुकाराम
डॉ. विश्वनाथ पवार ३१९
* बौद्ध तत्त्वज्ञान आणि संत तुकाराम
प्रा. प्रज्ञा कांबळे-शिरगांवकर ३२२
* तुकाराम शोधाची नवी दृष्टी
प्रा. राजेश पाटील ३२६
* संत तुकारामांच्या प्रभावातील कवी
डॉ. सविता केंजळे ३२९
* तुकारामशिष्या बहिणाबाई - एक अनुबंध
डॉ. सौ. विजया पवार ३३३



Scanned by CamScanner

# तुकाराम मीमांसा : एक आकलन

मच्छगंधाली तारळेकर
संशोधक विद्यार्थी, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

संत तुकाराम हे परखड अभंग रचना करणारे संत व कवी होते. दि. पु. चित्रे यांनी तुकारामांच्या अभंगांवर आणि भाषाशैलीवर समीक्षात्मक लेखन केलेले आहे. ते म्हणतात, तुकारामांचे चरित्रलेखन करणाऱ्यांचे दोन गट आहेत. त्यामध्ये पहिला हा पारंपरिक सनातनी लोकांकडून मांडलेले तुकारामांचे व्यक्तिमत्त्व आणि दुसरा गट म्हणजे पुरोगामी लेखकांनी, विचारवंतांनी संशोधनाच्या आधारे लिहिलेले व्यक्तिमत्त्व होय. तुकारामांबद्दल समाजात इतके विरूध्द वातावरण निर्माण झाले आहे की, एखाद्या संतांच भक्ती, श्रध्दा त्यांची पारमार्थिक ओढ यांचा विचार न करता केवळ बाह्यरूप समाजासमोर उभे करत असतो. यामुळे समाजात एक क्लीष्ट प्रतिमा उभी करण्याचा प्रयत्न केला गेला. ते म्हणतात, आपण तुकाराम महाराजांना एक संत, कवी आणि माणूस म्हणून स्वीकारले पाहिजे. समाजात जातीभेदातून निर्माण झालेली मानसिकता आणि धर्मातून आलेली प्रतिमा ही नाहीशी करून केवळ तुकारामांखे अलौकिक रूप आहे. तसे स्वीकारले पाहिजे.

संत तुकारामांनी पांडुरंगाशी संवाद मांडला त्याचप्रमाणे दि. पु. चित्रे यांनी तुकारामांच्या साहित्यातून त्यांच्याशी मांडला आहे. आधुनिक काळातील चित्र्यांना १७ व्या शतकातील तुकारामांनी आपल्या विचाराने वेडे केले आहे. दि. पु. चित्रे विठ्ठलाला म्हणतात की, विठ्ठला तू सगळ्या संतांचा प्राण आहेस, सगळे संत तुझ्या भेटीसाठी आसुसलेले असले तरी मला तुकारामच जास्त प्रिय आहे. तुकारामच प्राण आहेत. हे नाते कवीचे तुकारामांशी आहे. तुकारामांचा अंत या कवितेत तुकारामांचे नक्की शेवटी काय झाले? या प्रश्नाचा शोध कवीने घेतलेला आहे. जो-तो आपल्या परीने या प्रश्नाचे उत्तर शोधत राहिला. पण चित्रे म्हणतात, तुकारामांचे प्रयाण हे त्यांच्या व्यक्तिमत्त्वातून जाणून घेतले पाहिजे. त्यांच्या अभंगातून त्यांचे रूप आपणास दिसते. ते रूप वारकऱ्यांनी तसेच प्रत्येक माणसाने समजून उमजून घेतले पाहिजे. तुकारामांचे व्यक्तिमत्त्व हे वटवृक्षाप्रमाणे आहे. स्वतः स्वतःचे व्यक्तिमत्त्व जे इंद्रियांच्या तावडीतून सुटलेले, मोह-माया नसलेले काम आणि क्रोध यांना जिंकून विठ्ठलाशी एकरूप झालेले तुकारामांचे रूप येथे पाहावयास मिळते. तुकारामांविषयी लोकांनी ज्या अफवा पसरविल्या त्या दूर करण्याचा प्रयत्न दि. पुं. नी त्यांच्या तुकारामांचा अज्ञातवास या कवितेतून केला आहे. कवी म्हणतो, तुकाराम कोठेही पळाले, हरवले नाहीत तर ते इथेच आहेत.

१६०८ मध्ये झालेले तुकाराम आणि २० व्या शतकातील दि. पु. चित्रे यांच्यामध्ये एक विशाल पट असला तरी ते तुकारामांशी संवाद साधतात. तुकारामांच्या व्यक्तिमत्त्वाचा त्यांच्या भाषाशैलीचा प्रभाव अनेक लेखक व कवींवर आहे. पण तुकारामांशी वैश्विक नाते


ISSN No. 2319-6025
Scanned by CamScanner

जडलेले आणि त्यांच्याशी एकरूप झालेले कवी म्हणजेच दि. पु. चित्रे होय. त्यांनी अनेक समीक्षात्मक पुस्तके लिहिली आहेत. त्यामध्ये पुन्हा तुकाराम व सेज तुकाराम ही होय.

लहान वयात तुकोबा कोण आहेत आणि आपण त्यांच्यासमोर अगदी क्षुल्लक आहोत, हे जाणणारे कवी म्हणजेच दि. पु. चित्रे होय. वयाच्या सतराव्या वर्षी कविता लिहिण्यास सुरुवात केली. त्यांच्या कवितेची पहिली ओळ आहे, तुकाराम वाण्या, भैंचोद, तू खेचलंस मला मराठी भाषेच्या दलदलीत. यावरूनच दि.पुं.ना वाटते आपण तुकोबांच्या कवितेची काय किंमत करतो? या प्रश्नापेक्षा महत्त्वाचा प्रश्न तुकोबांनी आपल्या कवितेची काय किंमत केली असती? कवितेच्या प्रांतातील तर हा आपला खापर-खापर-खापर पणजोबा आहे. अस्तित्वाच्या जाणिवेतून मानवाला जगण्याची प्रेरणा देणारे संत तुकाराम होय. यांच्या कविता मानवी अस्तित्वाच्या अनुभवातून आणि वैश्विक माणूसपणावर प्रकाश टाकणारा आहे. परंपरा व नवता या कसोट्या लागल्या की, या गोष्टींचे द्वंद्व सुरू होते. या परस्परविरूध्द सुत्रातूनच जीवनमूल्य टिकवण्याचा प्रयत्न केला जातो. या पध्दतीनेच निर्माण झालेली मराठी भाषा कशी संस्कृताळली आणि संस्कृतचा आसरा मराठीला कसा घ्यावा लागला हे स्पष्ट करताना दि.पु.चित्रे म्हणतात, ज्ञानेश्वरांची ज्ञानेश्वरी केवळ मराठी आहे म्हणून लोक डोक्यावर घेत नाहीत तर ती भगवद्गीतेवरून लिहिली आहे म्हणून तिला जास्त महत्त्व आहे. तसेच पेशवाईमुळे मराठीचा संबंध तुटत गेला. त्याचा परिणाम मराठी भाषेवर झाला. त्यामुळेच ती संस्कृताळली आणि तिचे ब्राह्मणीकरण झाले. पुढे त्याचेच इंग्रजीकरण झाले.

जसे इंग्रजी भाषेचे ज्ञान समजावून घेताना शेक्सपीअर आणि गटे समजावून घेणे महत्त्वाचे आहे, तसेच मराठी भाषा समजावून घेण्यासाठी तुकोबांचे वाङ्मय समजून घेणे महत्त्वाचे आहे. दि. पु. चित्रे म्हणतात, तुकोबांसारख्या श्रेष्ठ लेखकाला मराठीच्या अभ्यासक्रमात महत्त्वाचे स्थान दिले तर खरी आधुनिक अभिजात रूप असलेली मराठी भाषा आहे हे सर्वांना समजेल. भाषाप्रसाराची माध्यमे जशी बदलत गेली तसा मराठी भाषेत फरक पडत गेला. उदा. आकाशवाणी, दूरदर्शन, रंगभूमी व व्यासपीठ होय. मराठी साहित्याच्या विश्वात तुकोबा १९व्या शतकापर्यंत अप्रकाशित राहिले. कारण तुकोबांच्या काव्याचा संस्कार व प्रभाव कवीपंचकावर नव्हता आणि कवितेच्या क्षेत्रात गाजलेल्या रविकिरण मंडळावरही नव्हता. पण मर्ढेकरांच्या काही कवितांवर यांचा प्रभाव असल्याचा भास होतो.

पेशव्यांच्या उदयापासून ते अस्तापर्यंत, अव्वल इंग्रजीपासून ते स्वातंत्र्याच्या पहिल्या दशकापर्यंत आपल्या दृष्टिकोनात तुकोबांच्या वह्या बुडालेल्याच राहिल्या आहेत. समीक्षेच्या क्षेत्रात तुकोबा अलिप्त राहिलेले आहेत. पण मध्ययुगात ज्ञानेशवरी सोईची वाटली. कारण अधयात्म व गुढवादाची धुसर गोडी असलेल्या पंडितांना व काव्यातील शब्दकोडी सोडविणाऱ्यांना ती योग्य वाटली. म्हणूनच वाङ्मयाची मुळे संस्कृतात शोधली जातात. त्यामुळेच मराठी वाङ्मयीन संस्कृतीत पोकळपणा जाणवत राहिला. तुकोबांच्या मराठी भाषेला व प्रमिभासंपन्न वाङ्मयाला साहित्यक्षेत्रातून तसेच सांस्कृतिक व सामाजिक क्षेत्रातून अलिप्त ठेवण्याचा प्रयत्न केलेला जाणवतो. मराठी भाषेचे मूळ असलेल्या संत तुकारामांची



Scanned by CamScanner

काव्यसंपदा आणि त्यांच्या परखड भाषाशैलीचे वेगळेपण दि. पु०. चित्रे यांनी मांडलेले आहे.

## तुकोबांच्या गाथेतील वेगळेपण

दि. पु. चित्रे यांच्या 'पुन्हा तुकाराम' या पुस्तकावरून उगवाई नियतकालिकामध्ये लेख आलेला आहे. त्यामध्ये त्यांनी तुकारामांच्या भाषेतील अस्तित्त्वानुभव, तुकारामांचे अभंग हे मराठी भाषेचे पर्यावरण, तिच्याशी निगडित असणारी वाङ्मयाची मूळ मराठी कल्पना, वाङ्मयातील मौखिक व लिखित परंपरा इ,विषयीची महत्त्वपूर्ण मांडणी केली आहे. तुकारामांचे व्यक्तित्व व वाङ्मय हे अस्तित्ववादी आहे. समाजामध्ये संत तुकारामांकडे पाहण्याचा दृष्टिकोन दुषित आहे. हे स्पष्ट करताना दि.पु,चित्रे म्हणतात, तुकोबांची कविता निव्वळ त्यांच्या पूर्वसुरींच्या वाङ्मयावर पोसलेली शैलीदार कृती नाही. केवळ विठ्ठलाच्या भक्त संप्रदायाच्या संदर्भात ती अर्थपूर्ण आहे असे नाही, फक्त सतराव्या शतकातील साधारण मराठी शेतकऱ्यांच्या आणि इतरांच्या जीवनाचे ते यथार्थ चित्रण करते इतका तिचा व्याप मर्यादित नाही. मराठी लोकजीवनाच्या अनंत तपशिलांना तुकोबांच्या प्रतिमासृष्टीत आणि भाषालंकारात एकजीव रूप आलेले आहे. ती निस्संदर्भ नाही. तर बहुसंदर्भी आहे. तिच्या भाषेची नजर जितकी अंतर्मुख आहे, तितकीच चौफेर आहे. तुकाराम महाराजांची भाषा ही ठराविक साच्यामध्ये न बसणारी आहे. चारही बाजुंनी विचार करायला लावणारी आहे.

तुकाराम गाथेकडे दि. पु. चित्रे एकसंध महाकृती आणि काव्यात्म आत्मचरित्र म्हणून बघतात. वयाची २१ वर्षे उलटल्यानंतर काही वर्षांनी तुकारामांना स्वप्नात दृष्टांत होऊन त्यांनी कवितेची जोखीम स्वीकारली. या कविता लिहिण्यासाठी त्यांना भंडाऱ्याचे, डोंगर, देहू व जवळपास पाचपन्नास कोसावरील परिसर कारणीभूत होता. या कवितांच्या गाथेच्या वह्या आजपर्यंत मिळालेल्या नाहीत. यातील अभंग हे त्यांच्या समकालीनांनी व अनुयायांनी पाठांतराने, भजनाद्वारे आत्मसात करून व मौखिक आणि लेखी पध्दतीने लिहून ठेवले आहे. तुकारामांच्या अभंगात मावळ भागातील शेतकरी, ग्रामीण भागाचे पर्यावरण तेथील समाज व संस्कृती यांचे संदर्भ येतात. तुकारामांनी अज्ञानातून आत्मज्ञान मिळवले, संसार भोगताना त्यातल्या अनिवार्य आणि अकल्पितपणे वाट्याला आलेल्या यातना अनुभवल्या. जन्ममरणाच्या चक्राच्या कल्पनेने ते क्रमशः भांबावून, भयभीत होऊन गेले. मग त्यांनी भक्तिमार्गाची निवड केली असे चित्र्यांना वाटते.

संत तुकारामांचे आराध्य दैवत म्हणजे विठ्ठल. या विठ्ठलाविषयी संत तुकारामांचा दृष्टिकोन मांडताना ते म्हणतात बाह्य विठोबाच्या कल्पनेपासून तुकोबांनी सुरुवात केली आणि विठोबाला प्रतिबिंबित करताच त्यांना स्वतःच्या विठोबामय अस्तित्वात हा जन्मच संपूर्ण आणि सर्व संदर्भापासून मुक्त झाल्याचा अनुभव मिळाला.

दि. पु. चित्रे यांनी अस्तित्वाचे साधन आणि माध्यम यांचा संबंध स्पष्ट केला आहे. सामान्य माणसाच्या जीवनाचे घटनाप्रसंग हेच तुकोबांच्याही जीवनाचे भाग आहेत. असे जाणवते. एखाद्या विषयाची तळमळ असणे हे तुकोबांच्या व्यक्तिमत्त्वाचा भाग आहे. माणसांना जे जे दुःख सोसावे लागले ते ते तुकोबांनाही सोसावे लागले आहे. भक्त आणि भक्तिचे जनकत्व म्हणजे संत तुकाराम होय. असे विवेचन करताना दि. पु. चित्रे म्हणतात, श्रध्दा-चिकित्सकता,

भावविवशता- युक्तीवाद, निस्पृहता-फटकळपणा या द्वंद्वाचा समुच्चय होय. अशाप्रकारे दि.पु.चित्रे यांनी तुकारामांची मीमांसा केलेली आहे.

**संदर्भ**

१. नसिराबादकर ल. रा. - प्राचीन मराठी वाङ्मयाचा इतिहास, फडके प्रकाशन, कोल्हापूर.
२. चित्रे दि. पु. - पुन्हा तुकाराम, पॉप्युलर प्रकाशन, मुंबई.
३. हातकणंगलेकर म. द. - उगवाई, अंक चौथा, मार्च १९९०.

* * * * * *



Scanned by CamScanner